केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक वनसंरक्षण योजना सन २०१५-२०१६ मधील प्रथम हप्ता मंजूरी

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः टिआरएस-०६/२०१५/प्र.क्र.१११/फ-६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख:- २८ जानेवारी, २०१६

वाचा :-

१) केंद्र शासन, पर्यावरण व वन मंत्रालय, पर्यावरण भवन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३२/पीएसओ/एफएस/२०१५ दिनांक २८.१०.२०१५

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१/सी/यो/प्र.क्र.४/४८२/१५-१६, दिनांक १९.६.२०१५

शासन निर्णय :-

एकात्मिक वनसंरक्षण, केंद्र पुरस्कृत योजना या योजनेंतर्गत सन २०१५-१६ करिता केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त नमूद दिनांक २८.१०.२०१५ च्या पत्रान्वये या योजनेअंतर्गत एकूण रु.७४५.५४ लक्षच्या प्रस्तावास मंजूरी दर्शविली आहे. यापैकी प्रथम हप्ता केंद्र शासनाने रु.२९८.२२ लक्ष इतका वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार प्रथम हप्ता केंद्र हिस्सा रु.२९८.२२ लक्ष व राज्य शासनाचा हिस्सा रु.१९८.८१ लक्ष इतका आहे.

योजना क्र.सी-७ अंतर्गत २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०२ (११), सामाजिक व क्षेत्र वनीकरण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, केंद्र पुरस्कृत योजना (११) (१७) आधुनिक वनवणवा नियत्रंण व व्यवस्थापन (२४०६ २०४३) ६०% केंद्रीय अनुदान रु.२९८.२२ लक्ष, व २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०२ (११) सामाजिक व क्षेत्र वनीकरण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना केंद्र पुरस्कृत योजना (११) (१८) आधुनिक वनवणवा नियत्रंण व व्यवस्थापन (२४०६ २३७५) ४०% राज्य शासन रुपये १९८.८१ लक्ष म्हणजेच रु.४९७.०३ लक्ष इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) योजनेतील मंजूर कामांवर खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

सदर निधी मागणी क्र.सी-७ अंतर्गत २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०२ (११) सामाजिक व क्षेत्र वनीकरण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना केंद्र पुरस्कृत योजना (११) (१७) आधुनिक वनवणवा नियंत्रण व व्यवस्थापन (२४०६ २०४३) (६० टक्के केंद्र पुरस्कृत), व २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०२ (११) सामाजिक व क्षेत्र वनीकरण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना केंद्र पुरस्कृत योजना (११) (१८) आधुनिक वनवणवा नियंत्रण व व्यवस्थापन (२४०६-२३७५) (४०% राज्य हिस्सा) अंतर्गत उपलब्ध असणाऱ्या व वितरीत केलेल्या निधीतून खर्च करण्यात यावा..

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १७.४.२०१५ आणि वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १२.१.२०१६ च्या परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८१५०९०२९५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Kashinath Mahajan

Digitally signed by Prakash Kashinath Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Kashinath Mahajan
Date: 2016.01.28 15:08:51 +05'30'

(प्रकाश महाजन)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर
३) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
६) मुख्य वनसंरक्षक, माहिती व तंत्रज्ञान व प्रसिध्दी, प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय
७) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
११) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग, अर्थ-६, व्यय-१०, अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२) ब-१ /फ-२/फ-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३) फ-६ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.